RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ५, अंक २७(३)] बुधवार, फेब्रुवारी २०, २०१९/फाल्गुन १, शके १९४० [पृष्ठे ३ किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ६१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० फेब्रुवारी २०१९

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०१५/१७४५/अनौ.सं.क्र.२४/प्र.क्र.५७३/म-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा क्र.६०), (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढलेला तथा अधिसूचित केलेला शासकीय आदेश महसूल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक. २०१५/१७४५/ अनौ. सं.क्र.२४/प्र.क्र.५७३/म-१, दिनांक ३१ मार्च २०१८ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त आदेश " असा करण्यात आला आहे) द्वारे गृहनिर्माण व नागरी दारिद्र्य निर्मूलन मंत्रालय, भारत सरकार यांची केंद्र पुरस्कृत योजना असलेली प्रधान मंत्री आवास योजना-सर्वांसाठी घरे (नागरी), यांतर्गत मान्यता दिलेल्या क्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या मालमत्तेसंबंधात उक्त आदेशासोबत जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या निवासी जागांच्या नियत वाटपाकरिता, प्रकल्प सूचक तथा प्रस्तावक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ई.डब्ल्यू.एस.) किंवा अल्प उत्पन्न गट (एल.आय.जी.) प्रवर्गातील कोणतेही युनिट खरेदी करणारा, यांच्यामधील व्यवहाराच्या प्रथम संलेखावर उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-१ च्या अनुच्छेद २५ च्या खंड(ब) अन्वये, अन्यथा आकरणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क, लोकहितार्थ तथा लोकहितास्तव तसे करणे आवश्यक असल्याची खात्री पटल्यामुळे, त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींना अधीन राहून, कमी केले असून रु. १००० (रुपये एक हजार फक्त) एवढ्या मर्यादेपर्यंत निश्चित केले होते ;

आणि ज्याअर्थी, उक्त आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याची सुनिश्चिती करण्याकरिता उक्त आदेशामध्ये सुधारणा करणे आवश्यक वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा क्र.६०) च्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे ' उक्त आदेशात ' लोकहितास्तव तथा लोकहितार्थ, सुधारणा करणे आवश्यक असल्याची खात्री पटल्यामुळे पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त आदेशामध्ये,—

१. अट तथा शर्त (१) मधील " महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने (म्हाडा) " या मजकुरानंतर, " किंवा संबंधित नियोजन प्राधिकरणाने किंवा प्रधानमंत्री आवास योजना-सर्वांसाठी घरे (नागरी) या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी गृहनिर्माण विभागाने

प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अन्य अभिकरणाने " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

२. अट तथा शर्त (३) मधील, " भोगवटा प्रमाणपत्र " या मजकुराऐवजी " प्रारंभ प्रमाणपत्र " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

३. अट तथा शर्त (६) नंतर, पुढील शर्त जादा दाखल करण्यात येईल :—

"(७) या आदेशांतर्गत मुद्रांक शुल्कातील कपात तथा घट ही, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा केवळ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या (ई.डब्ल्यू.एस.) किंवा अल्प उत्पन्न गट (एल.आय.जी.)या प्रवर्गातील निवासी घटकांनाच दिली जाईल. जर नोंदणीसाठी सादर करावयाच्या दस्तऐवजात नमूद केलेले चटई क्षेत्र हे, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रापेक्षा अधिक असेल तर, लाभार्थ्याला उक्त अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूची-१ च्या अनुच्छेद २५ च्या खंड (ब) अनुसार देय असलेले संपूर्ण मुद्रांक शुल्क भरावे लागले. " ;

४. " उक्त आदेशासोबत " जोडलेल्या अनुसूचीतील, स्तंभ (४) मध्ये, " क्षेत्र " या मजकुराऐवजी " चटई क्षेत्र " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रितमकुमार व. जावळे,**
कार्यासन अधिकारी.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 20th February 2019

### Order

MAHARASHTRA STAMP ACT.

No.Mudrank-2015/1745/UOR-24/CR-573/M-1.—Whereas, the Government of Maharashtra *vide* Government Order, Revenue and Forests Department, No. Mudrank-2015/1745/UOR.24/CR-573/M-1, dated the 31st March 2018 (hereinafter referred to as "the said Order"), issued in exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as "the said Act"), being satisfied that it is necessary so to do in the public interest, reduced and fixed the stamp duty to the extent of Rs.1000 (Rupees One Thousand only) as otherwise chargeable under clause (*b*) of Article 25 of Schedule-I appended to the said Act, on the first instrument of transaction, between the project Proponent/s and the Purchaser of any unit belonging to Economically Weaker Section (EWS) or Lower Income Group (LIG) category, for the allotment of residential premises as specified in the Schedule appended thereto, relating to the property located in the areas as approved under the Pradhan Mantri Awas Yojana-Housing for All (Urban) [hereinafter referred to as "the said PMAY(Urban)"], a Centrally Sponsored Scheme of the Ministry of Housing and Urban Poverty Alleviation, Government of India, subject to the conditions specified therein ;

And Whereas for ensuring smooth implementation of the said Order, it is considered necessary to amend the said Order ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause *(a)* of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary so to do in the public interest, hereby amends 'the said Order', as follows, namely :—

In the said Order,—

(*i*) in condition (1), after the words and brackets, "Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA)",the words "or any concerned Planning Authority or any other Agency authorized by the Housing Department to implement the said Pradhan Mantri AwasYojana-Housing for All (Urban)" shall be inserted ;

(*ii*) in condition (3), for the words "Occupancy Certificate", the words "Commencement Certificate" shall be substituted ;

(*iii*) after condition (6); following Condition shall be added, namely :—

"(7) The reduction in stamp duty under this order shall be granted only to the residential units belonging to Economically Weaker Section (EWS) or Lower Income Group (LIG) category as specified in the Schedule appended hereto. If the carpet area mentioned in the document to be produced for the registration is more than as specified in the Schedule appended hereto, then the beneficiary has to pay the full stamp duty chargeable under clause *(b)* of Article 25 of Schedule-I appended to the said Act."

(*iv*) in column (4) of the Schedule appended to 'the said Order', for the word, "area", the words, "Carpet area" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRITAMKUMAR V. JAWALE,
Desk Officer.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.